# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. 0217-2744770, 2744766, 2474767, 2744771

संकेतस्थळ http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in ई मेल : director.iil@sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

NAAC Accredited-2022

B ++ (CGPA2.96)


**Avishkar Section** | **अविष्कार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/अविष्कार/२०२२/133 दि. 18 AUG 2022

**प्रति,**
**मा.संचालक/प्राचार्या/प्राचार्य**
**पु.अ.हो.सोवसो/संलग्नित**
**सर्व महाविद्यालय/संस्था/संकुले**

**विषय :- महाविद्यालय/संकुलस्तरावर अविष्कार समन्वयकाची नेमणूक करुन महाविद्यालयस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव-२०२२ चे आयोजन करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृतीला चालना देण्यासाठी व त्यांचे संशोधन समाजापुढे आणण्याकरिता दरवर्षी विद्यापीठस्तरीय, आंतरविद्यापीठीय राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये सुसुत्रता आणण्याकरिता आणि संकुल/महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामध्ये प्रभावी संप्रेषणकरिता संकुल/महाविद्यालयस्तरावर अविष्कार समन्वयकाची आवश्यकता आहे. आपल्या संकुल/महाविद्यालयामधील अनुभवी व संशोधन वृत्तीच्या प्राध्यापकांची अविष्कार समन्वयक म्हणून नियुक्ती करुन त्यांच्या नावाच्या नोंदणीसाठी मा.संचालक/प्राचार्य यांच्या ई-मेलवरती एक लिंक देण्यात येईल त्या लिंकवरील Google Form द्वारे दि. ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत प्राध्यान्यक्रमाने अविष्कार समन्वयकाचे नाव नोंदणी करावी.

संकुल/महाविद्यालयस्तरावर दिनांक २५ संप्टेंबर, ते दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करावे यासाठी जास्तीत जास्त संशोधन विद्यार्थ्यी यांना यामध्ये सहभागी होण्यास प्रवृत करावे. याकरिता शक्यतो इतर संकुल/महाविद्यालयातील परीक्षक नेमून संबंधित संशोधन/ प्रकल्पाचे परीक्षण करावे व त्यातून अतिम निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी मा.सचांलक/प्राचार्य व संकुल/महाविद्यालयाने नियुक्त केलेले अविष्कार समन्वयक यांच्या ई-मेलवरती एक लिंक देण्यात येईल त्या लिंकवरील Google Form द्वारे दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत नोंदणी करावी. संकुल/महाविद्यालयस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या Project Synopsis चे एक पान पाटविणे गरजेचे आहे.

मा. संचालक/प्राचार्य व अविष्कार समन्वयक यांच्या ई-मेलवरती अविष्कार संशोधन महोत्सवाची सर्वसाधरण मार्गदर्शक तत्वे pdf स्वरुपात पाठविण्यात येईल तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अविष्कार या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात येईल. एका संशोधन प्रकल्पासाठी एकाच स्पर्धक विद्यार्थ्याची निवड करावी याबाबत काही अडचणी असल्यास coordinator.avishkar@sus.ac.in या ई-मेलवरती किंवा अविष्कार समन्वयक/सहसमन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.

वरीलप्रमाणे सर्व बाबीची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ.सचिन श्याम लढ्ढा)
संचालक
नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ

१. समन्वयक- डॉ व्ही.पी.धुळप- ७५८८३८४५७६
२. सहसमन्वयक- डॉ. ए.आर.शिंदे- ९७६४६१७३९३